दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १२१ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028


## महिला आणि पुरुष एकेरीतील भारताचे आव्हान संपुष्टात

**नवी दिल्ली :** २०२६ च्या बॅडमिंटन विश्व चॅम्पियनशिपमध्ये २० ऑगस्ट हा भारतासाठी निराशाजनक दिवस ठरला. महिला एकेरी, पुरुष एकेरी आणि मिश्र दुहेरीमधील भारताचे आव्हान संपुष्टात आले. महिला एकेरीमध्ये पीव्ही सिंधूला चीनच्या वांग झी यीकडून पराभव पत्करावा लागला, तर पुरुष एकेरीमध्ये आयुष शेट्टी इंडोनेशियाच्या अल्वी फरहानकडून पराभूत झाला. आयुष शेट्टीने पहिल्या फेरीत जागतिक क्रमवारीत अव्वल असलेल्या शी यू चीला पराभूत करून खळबळ उडवून दिली होती.

## शीख दंगल प्रकरणात दोषी माजी खा.सज्जन कुमार यांचे निधन

**नवी दिल्ली, 20 ऑगस्ट :** काँग्रेसचे माजी खासदार आणि नेते सज्जन कुमार यांचे गुरुवारी वयाच्या 80व्या वर्षी निधन झाले. मिळालेल्या माहितीनुसार, सज्जन कुमार यांना दिल्लीतील सफदरजंग रुग्णालयात मृतावस्थेत आणण्यात आले होते. 1984 च्या शीखविरोधी दंगलीशी संबंधित तीनपैकी दोन प्रकरणांमध्ये दोषी ठरल्यानंतर ते तिहार तुरुंगात जन्मठेपेची शिक्षा भोगत होते. एका प्रकरणात त्यांची निर्दोष मुक्तता झाली होती.

## थोडक्यात वार्ता

### न्या. यशवंत वर्मा यांच्याविरोधात एफआयआर दाखल करण्याची मागणी

**नवी दिल्ली :** न्यायिक उत्तरदायित्व आणि सुधारणांसाठी अभियान (सीजेएआर) यांनी अलाहाबाद हायकोर्टाचे माजी न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्याविरोधात गुन्हा दाखल करून चौकशी सुरू करण्याची मागणी केली आहे. लोकसभेच्या चौकशी समितीच्या अहवालानंतर ही मागणी करण्यात आली आहे. या अहवालात सरकारी निवासस्थानी लागलेल्या आगीच्या घटनेदरम्यान सापडलेल्या बेहिशेबी रोकडप्रकरणी न्यायमूर्ती वर्मा यांच्यावरील तिन्ही आरोप सिद्ध झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. न्यायमूर्ती वर्मा यांनी एप्रिल 2026 मध्ये राजीनामा दिला होता. मात्र, त्यांच्या राजीनाम्यानंतरही या प्रकरणाची चौकशी आणि उत्तरदायित्वाची प्रक्रिया थांबू नये, असे सीजेएआरचे म्हणणे आहे. चौकशी समितीचा अहवाल सभागृहात मांडण्याच्या निर्णयाचेही संघटनेने समर्थन केले आहे.सीजेएआरनुसार, चौकशी समितीचा अहवाल सार्वजनिक प्रक्रियेत पुढे नेणे हे न्यायव्यवस्थेतील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल आहे.

### परळीत जिम ट्रेनर तरुणीची गळफास घेऊन आत्महत्या

**बीड:** परळी शहरातील इंदिरानगर परिसरात एका २३ वर्षीय जिम ट्रेनर तरुणीने राहत्या घरी गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवल्याची अत्यंत दुर्दैवी घटना समोर आली आहे. तुलसी संजय कमळु असे आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव असून, या तरुण आणि होतकरू तरुणीने टोकाचे पाऊल उचलल्याने परळी शहरात आणि संपूर्ण परिसरात मोठी हळहळ व्यक्त होत आहे. तुलसी परळी शहरातील एका जिममध्ये ट्रेनर म्हणून कार्यरत होती आणि परिसरात ती अत्यंत मनमिळाऊ व परिचित होती. गुरुवारी (२० ऑगस्ट) दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. घटनेच्या वेळी तिचे कुटुंबीय बाहेरगावी गेले असल्यामुळे ती घरी एकटीच होती. याच एकांतात तिने राहत्या घरी ओढणीच्या साहाय्याने पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली.

### आईपासून दुरावलेली चार वर्षीय आरोही पोलिसांच्या प्रयत्नांनी सुखरूप घरी



**लातूर :** देवणी येथील आठवडी बाजारात आईपासून दुरावलेल्या अवघ्या चार वर्षीय आरोहीचा देवणी पोलिसांनी अवघ्या चार तासांत शोध घेऊन तिला सुखरूप वडिलांच्या ताब्यात दिले. मुलीला व्यवस्थित बोलता येत नसल्याने तिची ओळख पटविणे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. मात्र, पोलिसांनी संवेदनशीलता आणि तत्परता दाखवत सोशल मीडियाच्या माध्यमातून माहिती प्रसारित करून तिच्या कुटुंबीयांपर्यंत पोहोचविण्यात यश मिळविले. सायंकाळी चारच्या सुमारास देवणी येथील आठवडी बाजार परिसरात आरोही ही चार वर्षीय मुलगी पोलिसांना हरवलेल्या अवस्थेत आढळून आली. आईपासून दुरावल्यामुळे ती अत्यंत घाबरलेली होती. तिला व्यवस्थित बोलता येत नसल्याने तिचे नाव, पत्ता किंवा पालकांची माहिती मिळविण्यात अडचणी येत होत्या. देवणी पोलिसांनी तात्काळ मुलीची काळजी घेत तिच्या पालकांचा शोध सुरू केला. मुलीची ओळख पटविण्यासाठी तिचे छायाचित्र आणि माहिती सोशल मीडियाच्या विविध माध्यमांतून प्रसारित करण्यात आली. मुलीचे वडील अजय चव्हाण अशिक्षित असून त्यांच्याकडे मोबाईल फोनही नसल्याचे समोर आले.

## फर्दापूरकरांच्या जीवाशी खेळ पिण्याच्या पाण्यातून येतोय 'पेट्रोल केमिकल'चा वास 35 वर्षे विकत पाणी घेणारे भारतातील एकमेव गाव

### पर्यटन स्थळ असूनही प्रशासनाचा ढिसाळ कारभार बोगस नळ योजनेमुळे मजुरांवर रोज पाणी विकत घेण्याची नामुष्की

हिंदु प्रकाश वार्ता / शेख हक्कानी

**फर्दापूर ता. सोयगाव :** फर्दापूर गावात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अत्यंत बिकट आणि जीवघेणा बनला आहे नळाला वेळेवर पाणी येत नसल्याने नागरिकांना नाईलाजाने विकत घ्याव्या लागणाऱ्या बोअरवेलच्या पाण्यातून चक्क पेट्रोल आणि केमिकल सारखा उग्र वास येत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे हे दूषित पाणी प्यायल्यामुळे गावकऱ्यांना पोटदुखीचा त्रास सुरू झाला असून गावात आरोग्याची मोठी आणीबाणी निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे पाणी असूनही ३५ वर्षे विकत पिण्याची नामुष्की भारतात कुठेही नसेल असे उदाहरण

फर्दापूर हे जगप्रसिद्ध अजिंठा लेण्यांच्या जवळ असलेले महत्त्वाचे पर्यटन स्थळ आहे. असे असूनही येथील स्थानिक नागरिकांच्या नशिबी पाण्यासाठी केवळ वनवासच आला आहे. १९७० ते १९९० चा काळ या काळात फर्दापूर ग्रामपंचायतीची अधिकृत पाणीपुरवठा योजना सुरळीत सुरू होती

३५ वर्षांचा काळाकुट्ट इतिहास १९९० नंतर योजना बंद पडली संपूर्ण भारतात फर्दापूरसारखे दुर्दैवी उदाहरण तुम्हाला कुठेही पाहायला मिळणार नाही जिथे गावात मुबलक पाणी उपलब्ध असूनही प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे नागरिकांना सलग ३५ वर्षे स्वत च्या खिशातून पैसे मोजून विकतचे पाणी प्यावे लागले आहे हे प्रशासनासाठी अत्यंत लांछनास्पद आहे

बोगस पाईपलाईनचा फटका तब्बल ३५ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर गावात पुन्हा



एकदा पाणीपुरवठा योजना सुरू झाली खरी परंतु अतिशय निकृष्ट आणि बोगस' पाईपलाईनच्या कामामुळे नळाला वेळेवर पाणीच मिळत नाही परिणामी ग्रामस्थांना आजही पाणी विकतच घ्यावे लागत आहे

**मजुरांनी पाण्यासाठी पैसे आणायचे कुठून :** शासकीय योजना असूनही नळाला वेळेवर पाणी येत नसल्याने नागरिकांना पुन्हा बोअरवेलचे पाणी विकत घ्यावे लागते फर्दापूरमध्ये मोठ्या प्रमाणात रोजंदारीवर काम करणारे गरीब कामगार व मजूर राहतात रोजचे पोट भरण्यासाठी धडपडणाऱ्या या मजुरांनी रोजच्या पिण्याच्या पाण्यासाठी पैसे कुठून आणायचे असा अत्यंत संतप्त सवाल ग्रामस्थ विचारत आहेत. एवढे मोठे पर्यटन स्थळ असूनही पंचायत समिती आणि स्थानिक प्रशासन या गंभीर प्रश्नाकडे पूर्णपणे अंधेखा' दुर्लक्ष करत आहे

**विक्री होणाऱ्या १० बोअरवेलच्या पाण्यात 'केमिकल :** गावात एकूण ५० पैकी सुमारे १० बोअरवेलधारक व्यावसायिक तत्त्वावर पाण्याची विक्री करतात मात्र सध्या या विक्री होत असलेल्या पाण्यातून पेट्रोल आणि घातक केमिकलचा वास येत आहे. हे पाणी प्यायल्याने लहान मुले आणि नागरिकांना पोटदुखी व मळमळीचा त्रास होत आहे

**ग्रामस्थांची प्रशासनाकडे तातडीची मागणी :** चौकशी व पाहणी सोयगाव पंचायत समितीचे पाणीपुरवठा अधिकारी व प्रशासनाने तातडीने फर्दापूर गावात येऊन या सर्व बोअरवेलच्या पाण्याचे नमुने घ्यावेत आणि ते प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवावेत बोगस पाईपलाईन दुरुस्ती निकृष्ट ठरलेली नळ योजनेची पाईपलाईन तात्काळ दुरुस्त करून नळाद्वारे स्वच्छ व नियमित पाणीपुरवठा सुरू करावा

प्रशासनाने तात्काळ पावले उचलून या जीवघेण्या पाणीबाणीतून फर्दापूरकरांची सुटका केली नाही तर नागरिक रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडतील असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे

## जर जरी जर बक्ष यांच्या 740व्या उरुसाला पारंपरिक संदल मिरवणुकीने उत्साहात प्रारंभ

हिंदु प्रकाश वार्ता / संतोष करपे

**छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रतिनिधी :** खुलताबाद येथील हजरत ख्वाजा शेख मुन्तजबोद्दीन जर जरी जर बक्ष दूल्हा रह. यांच्या ७४०व्या उरुसाला गुरुवारी पारंपरिक संदल मिरवणुकीने उत्साहात सुरुवात झाली. उरुसाची सांगता २६ ऑगस्ट रोजी ईद-ए-मिलादुन्नबीच्या दिवशी होणार असून, २३ ऑगस्ट रोजी हजरत बाबा बुन्हानोद्दीन यांच्या ठिकाणी मुशायऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

संदल मिरवणुकीत ढोल-ताशा, विविध वैजापूर येथील प्रसिद्ध असलेला हबीब भाई चाऊस बँड पथकांचा सहभाग होता. बँड पथकांनी सादर केलेल्या जुन्या देशभक्तीपर गीतांमुळे वातावरणात उत्साह निर्माण झाला. मिरवणूक पाहण्यासाठी शहरातील रस्त्यांच्या दुतर्फा भाविकांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी दारूगोळ्याची आतषबाजीही करण्यात आली.

उरुस व्यवस्था समितीचे अध्यक्ष तथा तहसीलदार संतोष गुट्टे, मुख्याधिकारी तथा सचिव समीर, शेख



नगराध्यक्ष आमेर पटेल, दर्गा कमिटीचे अध्यक्ष एजाज अहमद, उपाध्यक्ष इमरान जागीरदार, सचिव मोहम्मद मतीन जहांगीरदार, माजी नगराध्यक्ष सदस्य दर्गा कमिटी एड. कैसरोद्दीन यांच्यासह मुनिबोद्दीन, मुबशिरोद्दीन, शेख युसुफ, सालेह मोहम्मद, हबीबोद्दीन, मुजीबोद्दीन, हाफिजोद्दीन, कामरानोद्दीन आणि अबरार अहमद उपस्थित होते. नगरपरिषदेचे कार्यालयीन अधीक्षक रुस्तुम फुलारे, वरिष्ठ लिपिक अंकुश भराड पाटील पाणीपुरवठा इंजिनियर श्रीहरी चौडेकर मुख्य लेखपाल किशोर मोरे वरिष्ठ लिपिक जितेंद्र बोचरे, पाणीपुरवठा कर्मचारी अशोक भंडारे, शेख इरफानोद्दीन, भानुदास सोनवणे सतीश भालेराव नितीन गोल्हार यांच्यासह नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

उरुसाच्या पार्श्वभूमीवर शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस प्रशासनाकडून विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला होता. गोपनीय शाखेचे पोलीस कर्मचारी के. के. गवळी, बीट जमादार शेख जाकीर यांच्यासह पोलीस कर्मचारी मिरवणुकीच्या मार्गावर तैनात होते. पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली उरुस परिसरात तसेच संदल मिरवणुकीच्या मार्गावर कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला. कोणताही अनुचित प्रकार न घडता पारंपरिक संदल मिरवणूक उत्साहात आणि शांततेत पार पडली.

## काँग्रेसचे माजी खजिनदार रामगोपाल अग्रवाल यांच्या निवासस्थानी ईडीची छापेमारी

**रायपूर, २० ऑगस्ट :** ईडीने छत्तीसगडमधील धमतरी येथील सिहावा रोडवरील काँग्रेसचे माजी खजिनदार रामगोपाल अग्रवाल यांच्या निवासस्थानी छापा टाकला. ईडीचे पथक सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास दोन वेगवेगळ्या वाहनांमधून अग्रवाल यांच्या घरी पोहोचले.

या पथकात सुरक्षा कर्मचाऱ्यांसह आठ सदस्य आहेत. घराबाहेर सुरक्षा दल तैनात करण्यात आले असून, कोणालाही आत प्रवेश दिला जात नाही. अधिकारी घरातील कागदपत्रे आणि इतर महत्त्वाच्या नोंदींची तपासणी करत आहेत. सिंडिकेटने गोळा केलेल्या बेकायदेशीर कमिशनमध्ये आणि कोट्यवधी रुपयांच्या काळ्या पैशाच्या मनी लॉंड्रिंगमध्ये रामगोपाल अग्रवाल यांनी महत्त्वाची भूमिका बजावली असल्याचा ईडीचा दावा आहे. काँग्रेस नेते रामगोपाल अग्रवाल सध्या रायपूर मध्यवर्ती कारागृहात आहेत.

छत्तीसगडमधील हाय-प्रोफाईल दारू आणि कोळसा उपकर घोटाळ्याच्या प्रकरणांमध्ये तपास यंत्रणांनी त्याची चौकशी आणि कोठडी पूर्ण केल्यानंतर, न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडीत पाठवले. तो आधीच खटला सुरू असलेला आरोपी म्हणून केंद्रीय कारागृहात होता. दरम्यान, ११ ऑगस्ट २०२६ रोजी ईडीने दारू घोटाळ्याशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात त्याला कारागृहातून औपचारिकपणे अटक केली.

## अमित शाह यांचा काँग्रेसवर निशाणा, 'वंदे मातरम'वरुन तुष्टीकरणाचा आरोप

**नवी दिल्ली, २० ऑगस्ट :** 'वंदे मातरम' हे संपूर्ण गीत गाण्याऐवजी केवळ दोन कडवी गाण्याच्या काँग्रेस कार्यकारिणी समितीच्या निर्णयावर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. हे राष्ट्रविरोधी पाऊल असल्याचे सांगत, काँग्रेस पुन्हा एकदा तुष्टीकरण आणि व्होट बँक राजकारणाच्या मार्गावर परतत असल्याचा आरोप त्यांनी केला.


अमित शाह म्हणाले की, १९३७ मध्ये काँग्रेसने तुष्टीकरणासाठी 'वंदे मातरम'चे दोन भाग करण्याचा निर्णय घेतला होता. त्यांच्या मते, अशा प्रकारच्या राजकारणामुळे द्विराष्ट्र सिद्धांताला बळकटी मिळाली आणि नंतर देशाच्या फाळणीसाठी परिस्थिती निर्माण झाली. ते म्हणाले की, 'वंदे मातरम'च्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त मोदी सरकारने संपूर्ण गीताला कायदेशीर मान्यता देऊन ही ऐतिहासिक चूक सुधारली. शाह यांनी आरोप केला की, राहुल गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पुन्हा एकदा व्होट बँक राजकारणासाठी त्याच तुष्टीकरणाच्या मार्गावर चालत आहे. अमित शाह यांनी काँग्रेस पक्षाचा हा निर्णय म्हणजे संसदेने केलेल्या कायद्याचा उघडपणे केलेला अवमान असल्याचे म्हटले आहे. त्यांनी देशवासियांना काँग्रेस पक्षाच्या कथित तुष्टीकरणाच्या राजकारणाविरोधात एकजूट होऊन आवाज उठवण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की, 'वंदे मातरम'च्या बाबतीत झालेल्या पूर्वीच्या चुकीचे परिणाम देशाला आधीच भोगावे लागले आहेत आणि अशी चूक पुन्हा होऊ नये.

## जर जरी बक्ष खुलताबाद उर्स मैदान येथे पाहणी करताना मुख्याधिकारी समीर शेख



हिंदु प्रकाश वार्ता / संतोष करपे

**छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील मोठा प्रसिद्ध असलेला खुलताबाद जर जरी बक्ष यांच्या ७४० उर्स मैदान व्यवस्था तयारीची पाहणी करताना खुलताबाद नगर परिषदे चे मुख्याधिकारी तथा उर्स व्यवस्था समितीचे सचिव समीर शेख नगर परिषद कार्यालयाचे वरिष्ठ लिपिक अंकुश भराड पाटील. यांच्यासह दर्गा परिसर . अग्निशामक दलाची गाडी. रस्ते. स्वच्छता लाईट व्यवस्था. पाणी पुरवठा व्यवस्था. सह मूलभूत सुविधेची पाहणी करून नगरपरिषदेच्या वतीने पुरवल्या जाणाऱ्या सर्व सुविधेचा प्रत्यक्ष पाहणी करू आढावा घेतला महाराष्ट्र भरातून येणाऱ्या भाविक भक्तांना कुठलीही अडचणी येऊ नये याबाबत सर्व व्यवस्था प्रमुखांना सूचना देऊन आपापल्या जबाबदाऱ्या चोक पणे पार पाडा अशा स्पष्ट आदेश मुख्याधिकारी नगर परिषद खुलताबाद समीर शेख यांनी कर्मचाऱ्यांना दिले. याप्रसंगी नगर परिषद कार्यालयीन अधीक्षक रुस्तुम फुलारे पाणीपुरवठा इंजिनियर श्रीहरी चौडेकर . मुख्य लेखपाल किशोर मोरे लेखपाल सुभाष चव्हाण. स्वच्छता निरीक्षक हरिहर चादावाडे पाणी पुरवठा प्रमुख अशोक भंडारी वरिष्ठ लिपिक जितेंद्र बोचरे . वरिष्ठ लिपिक आप्पाराव देवकर संतोष आव्हाड. सतीश भालेराव भानुदास सोनवणे यांच्यासह नगर परिषदे चे कर्मचारी परिश्रम घेत आहे







# सं पा द की य

## स्थानिक पशुधनाला राष्ट्रीय सन्मान आणि ग्रामीण विकास

महाराष्ट्रातील 'उमरडा' या गाईला स्वतंत्र देशी गोवंश म्हणून आणि 'माडग्याळ' या मेंढीला राष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र व अधिकृत प्रजाती (ब्रीड) म्हणून मान्यता मिळणे, हा राज्यातील पशुपालकांसाठी आणि कृषी संस्कृतीसाठी ऐतिहासिक क्षण आहे. राष्ट्रीय पशु आनुवंशिक संसाधन ब्यूरोने (ICAR-NBAGR) घेतलेला हा निर्णय महाराष्ट्राच्या पारंपरिक पशुधन संपदेवर राष्ट्रीय स्तरावर शिक्कामोर्तब करणारा आहे. या निर्णयामुळे केवळ स्थानिक प्रजातींची नवी ओळख निर्माण झाली नसून, त्यांच्या जतन आणि संवर्धनाला संस्थात्मक व शास्त्रीय बळ मिळणार आहे. विदर्भातील बंजारा समाजाने पिढ्यानपिढ्या जतन केलेला 'उमरडा' गोवंश असो वा सांगली जिल्ह्यातील धनगर व रामोशी समाजाने विकसित केलेली 'माडग्याळ' मेंढी असो; या दोन्ही प्रजातींनी प्रतिकूल हवामानातही स्वतःचे अस्तित्व आणि उत्पादनक्षमता टिकवून ठेवली आहे. माडग्याळ मेंढीची वजन वाढण्याची जलद क्षमता आणि रोगप्रतिकारक शक्ती, तर उमरडा गोवंशाची स्थानिक परिस्थितीशी जुळवून घेण्याची ताकद ही आपली खरी ग्रामीण संपत्ती आहे. या प्रजातींची हीच वैशिष्ट्ये लक्षात घेऊन राज्य शासनाचा पशुसंवर्धन विभाग, शेळी-मेंढी विकास महामंडळ आणि संशोधन संस्थांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर मोठे यश आले आहे. या अधिकृत नोंदणीमुळे आता केंद्र व राज्य सरकारच्या विशेष कल्याणकारी योजना, आनुवंशिक सुधारणा कार्यक्रम आणि संशोधनासाठीचा निधी थेट या प्रजातींच्या संवर्धनासाठी उपलब्ध होईल. यातून शास्त्रीय पद्धतीने पैदास वाढवून पशुपालकांचे उत्पन्न वाढवणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला अधिक बळकट करणे सोपे होणार आहे. स्थानिक पशुधनाचे जतन ही केवळ परंपरेची गोष्ट नसून, ते भविष्यातील अन्न सुरक्षा आणि शाश्वत शेतीचे महत्त्वाचे साधन आहे. या मान्यतेचा खरा फायदा तळागाळातील पशुपालक, शेतकरी आणि मेंढपाळांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रशासनाने आता विशेष मोहीम राबवून सुधारित प्रजननाचे कार्यक्रम वेगाने अमलात आणणे गरजेचे आहे.

# मानवतेचा हातच संकटातील खरा आधार

दरवर्षी १९ ऑगस्ट हा दिवस ‘जागतिक मानवतावादी दिन’ म्हणून जगभर साजरा केला जातो. संकटाच्या काळात मानवतेची सेवा करणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांना अभिवादन करणे, युद्ध, नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ, साथीचे रोग, विस्थापन, गरिबी आणि विविध मानवी संकटांमध्ये अडकलेल्या लोकांच्या वेदनांकडे जगाचे लक्ष वेधणे तसेच प्रत्येक मानवाच्या जीवनाचा आणि प्रतिष्ठेचा सन्मान करण्याचा संदेश देणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. मानवतावाद म्हणजे केवळ संकटाच्या वेळी मदत करणे नव्हे, तर प्रत्येक व्यक्तीला माणूस म्हणून समान सन्मान, सुरक्षितता आणि जगण्याचा अधिकार आहे, ही जाणीव मनात दृढ करणे होय. संकटग्रस्तांच्या मदतीसाठी स्वतःचा जीव धोक्यात घालून काम करणाऱ्या मानवतावादी कार्यकर्त्यांचे योगदान या दिवशी विशेषत्वाने स्मरणात घेतले जाते. त्यामुळे जागतिक मानवतावादी दिन हा माणुसकीच्या सामर्थ्याचा, करुणेचा आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा जागतिक जागर ठरतो.

१९ ऑगस्ट २००३ रोजी बगदाद येथील संयुक्त राष्ट्रांच्या कॅनाल हॉटेलवरील बॉम्बस्फोटात २२ मानवतावादी कार्यकर्त्यांचा मृत्यू झाला; त्यांच्या स्मरणार्थ संयुक्त राष्ट्रांनी १९ ऑगस्ट हा ‘जागतिक मानवतावादी दिन’ म्हणून घोषित केला. हा दिवस संकटग्रस्तांच्या सेवेसाठी कार्य करणाऱ्या मानवतावादी कार्यकर्त्यांच्या धैर्याला आणि त्यागाला अभिवादन करण्याचा दिवस आहे.

मानवतावादाची संकल्पना मुळात अत्यंत व्यापक आहे. दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव होणे, त्याच्या वेदनेशी आपले भावनिक नाते जोडले जाणे आणि शक्य त्या पद्धतीने त्याच्या मदतीला धावून जाणे म्हणजे मानवतावाद. यात दया आणि सहानुभूतीबरोबरच समानता, न्याय, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठेचा विचार अंतर्भूत आहे. एखादी व्यक्ती कोणत्या धर्माची आहे, कोणत्या जातीची आहे, तिची भाषा कोणती आहे, ती कोणत्या प्रदेशातून आली आहे किंवा तिची आर्थिक परिस्थिती काय आहे, याचा विचार न करता तिच्या संकटात मदतीचा हात पुढे करणे ही मानवतावादी वृत्ती होय. मानवतावाद माणसामाणसांतील कृत्रिम भेद ओलांडतो. म्हणूनच मानवतावाद हा कोणत्याही एका धर्माचा, देशाचा किंवा समाजाचा विचार नसून संपूर्ण मानवजातीला जोडणारे सार्वत्रिक मूल्य आहे.

आजच्या जगाकडे पाहिले तर मानवतावादी कार्याची गरज किती मोठी आहे, हे सहज लक्षात येते. जगाच्या विविध भागांत युद्धे आणि सशस्त्र संघर्ष सुरू आहेत. लाखो लोकांना आपली घरे सोडून विस्थापित व्हावे लागत आहे. अनेक कुटुंबांचे उपजीविकेचे साधन नष्ट होत आहे. मुलांचे शिक्षण खंडित होत आहे. रुग्णालये आणि आरोग्यसेवा बाधित होत आहेत. अन्न, पाणी आणि औषधांची टंचाई निर्माण होत आहे. अशा परिस्थितीत सामान्य नागरिकांचे जीवन अत्यंत असुरक्षित होते. महिला, बालके, वृद्ध, दिव्यांग व्यक्ती आणि आजारी व्यक्तींना संकटाचा अधिक तीव्र परिणाम सहन करावा लागतो. त्यामुळे मानवतावादी मदत ही केवळ अतिरिक्त सुविधा नसून अशा परिस्थितीत जीवन वाचविण्यासाठी अत्यावश्यक व्यवस्था बनते.

युद्धाच्या काळात मानवतावादी कार्याचे महत्त्व विशेष वाढते. युद्ध कोणत्याही कारणाने सुरू झाले असले तरी त्याची सर्वाधिक झळ सामान्य नागरिकांना बसते. घरांवर बॉम्बहल्ले होतात, रस्ते आणि पूल उद्ध्वस्त होतात, रुग्णालयांवर ताण वाढतो आणि मूलभूत सुविधा कोलमडतात. अशा वेळी मानवतावादी कार्यकर्ते अन्न, पाणी, औषधे, वैद्यकीय सेवा, निवारा आणि सुरक्षिततेशी संबंधित मदत पोहोचविण्याचे काम करतात. अनेक वेळा ते अशा प्रदेशांत काम करतात, जिथे स्वतःच्या जीवाला मोठा धोका असतो. तरीही मानवतेच्या सेवेसाठी ते आपले कर्तव्य पार पाडतात. म्हणूनच मानवतावादी कार्यकर्त्यांची सुरक्षितता ही संपूर्ण जगाची जबाबदारी आहे. मदतकार्य करणाऱ्या व्यक्तींवर हल्ले होणे म्हणजे मानवतेवरच हल्ला होय.

मानवतावादी कार्य केवळ युद्धाच्या प्रदेशांपुरते मर्यादित नाही. नैसर्गिक आपत्तींच्या वेळीही त्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. पूर, भूकंप, चक्रीवादळ, भूस्खलन, दुष्काळ, अतिवृष्टी, उष्णतेच्या लाटा आणि जंगलातील आगी यांसारख्या आपत्तींमुळे हजारो कुटुंबांचे जीवन विस्कळीत होते. घरांचे नुकसान होते, पिके नष्ट होतात, जनावरे मृत्युमुखी पडतात आणि रोजगाराची साधने हिरावली जातात. अशा वेळी तातडीने अन्न, पाणी, कपडे, औषधे आणि निवारा उपलब्ध करून देणे आवश्यक असते. मात्र मदतकार्य केवळ तात्पुरत्या स्वरूपाचे न राहता पुनर्वसन आणि पुनर्निर्माणाशी जोडले गेले पाहिजे. आपत्तीग्रस्त व्यक्तीला पुन्हा स्वावलंबी बनविणे आणि तिच्या जीवनाला स्थैर्य मिळवून देणे हा मानवतावादी दृष्टिकोनाचा महत्त्वाचा भाग आहे.

हवामानबदलामुळे मानवतावादी संकटांचे स्वरूप आणखी गुंतागुंतीचे झाले आहे. वाढते तापमान, अनियमित पाऊस, अतिवृष्टी, दीर्घकालीन दुष्काळ, चक्रीवादळे आणि इतर हवामानविषयक संकटांचा परिणाम समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांवर अधिक होतो. ग्रामीण भागातील शेतकरी, भूमिहीन कामगार, आदिवासी समुदाय, स्थलांतरित कामगार आणि गरीब कुटुंबे या संकटांना अधिक असुरक्षित असतात. त्यामुळे मानवतावादाचा विचार पर्यावरणीय न्यायाशी जोडणे आवश्यक झाले आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन, शाश्वत विकास, आपत्तीपूर्व तयारी आणि स्थानिक समुदायांचे सक्षमीकरण यांचा मानवतावादी कार्यात समावेश झाला पाहिजे.

भारतीय समाजाच्या परंपरेत मानवतावादाला फार मोठे स्थान आहे. संत परंपरेने माणुसकी, समता, बंधुभाव आणि करुणेचा पुरस्कार केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांवर आधारित समाजव्यवस्थेची भूमिका मांडली. भारतीय संविधानाची प्रस्तावनाही न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांवर समाजाची उभारणी करण्याचा संदेश देते. त्यामुळे आधुनिक मानवतावादाची मूल्ये भारतीय लोकशाहीच्या मूलभूत विचारांशी अतिशय जवळची आहेत.

मानवतावादाचा केंद्रबिंदू म्हणजे मानवी प्रतिष्ठा होय. मदत करताना गरजू व्यक्तीकडे केवळ ‘दयेचे पात्र’ म्हणून पाहणे योग्य नाही. संकटग्रस्त व्यक्तीलाही स्वाभिमान, निर्णयक्षमता आणि अधिकार असतात. त्यामुळे मानवतावादी मदत ही सन्मानपूर्वक आणि गरजू व्यक्तीच्या गरजा लक्षात घेऊन दिली पाहिजे. अन्न किंवा कपडे देणे ही तातडीची गरज भागविणारी कृती असली तरी त्यापुढे जाऊन रोजगार, शिक्षण, आरोग्य, कौशल्यविकास आणि सामाजिक सुरक्षितता उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. मदत घेणाऱ्या व्यक्तीला पुन्हा स्वतःच्या पायावर उभे राहता येईल, अशी परिस्थिती निर्माण करणे हेच खरे सक्षमीकरण होय.

मानवतावादी कार्यामध्ये स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक समुदायांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. आपत्तीच्या वेळी सरकारी यंत्रणा मदतीसाठी प्रयत्नशील असते; परंतु प्रत्येक व्यक्तीपर्यंत तातडीने पोहोचणे नेहमी शक्य होत नाही. अशा वेळी स्थानिक स्वयंसेवक, सामाजिक संस्था, युवक मंडळे, महिला बचतगट, विद्यार्थी संघटना आणि समुदायाधारित संस्था महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यांना स्थानिक परिस्थिती, भाषा आणि गरजांची माहिती असल्यामुळे मदतकार्य अधिक परिणामकारक ठरते. संकटाच्या काळात समाजातील विविध घटकांनी एकत्र येऊन काम केल्यास उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य वापर होतो आणि अधिकाधिक लोकांपर्यंत मदत पोहोचविता येते.

युवकांची भूमिका या संदर्भात विशेष महत्त्वाची आहे. युवकांमध्ये ऊर्जा, तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि सामाजिक सहभागाची क्षमता मोठी असते. रक्तदान, अन्नवाटप, आपत्तीग्रस्तांना मदत, जनजागृती, स्वच्छता अभियान, आरोग्यशिबिरे आणि सामाजिक माध्यमांद्वारे मदतसंकलन अशा अनेक क्षेत्रांत युवक प्रभावी योगदान देऊ शकतात. शिक्षणसंस्थांनी विद्यार्थ्यांमध्ये केवळ ज्ञान आणि कौशल्ये विकसित न करता सामाजिक संवेदनशीलता, सहानुभूती आणि स्वयंसेवेची भावना निर्माण केली पाहिजे. शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट केवळ रोजगारप्राप्ती नसून जबाबदार आणि संवेदनशील नागरिक घडविणे हेही आहे.

दिव्यांग व्यक्तींच्या संदर्भात मानवतावादी दृष्टिकोन अधिक संवेदनशील असणे आवश्यक आहे. आपत्तीच्या वेळी स्थलांतर, सुरक्षित निवारा, वाहतूक, आरोग्यसेवा आणि माहिती मिळविताना दिव्यांग व्यक्तींना अनेक अडचणी येऊ शकतात. म्हणून आपत्ती व्यवस्थापनाच्या योजना सर्वसमावेशक असणे आवश्यक आहे. माहिती सर्वांना समजेल अशा पद्धतीने उपलब्ध करणे, प्रवेशयोग्य निवारे तयार करणे, सहाय्यक साधने उपलब्ध करून देणे आणि आवश्यकतेनुसार प्रशिक्षित स्वयंसेवकांची मदत देणे ही समाजाची जबाबदारी आहे. मानवतावादाची खरी कसोटी समाजातील सर्वाधिक असुरक्षित व्यक्तीपर्यंत मदतीचा हात पोहोचतो की नाही, यात आहे.

डिजिटल युगाने मानवतावादी कार्यासाठी नवीन संधी निर्माण केल्या आहेत. सामाजिक माध्यमांमुळे एखाद्या आपत्तीची माहिती काही क्षणांत जगभर पोहोचू शकते. डिजिटल निधीसंकलन, स्थाननिश्चिती तंत्रज्ञान, उपग्रहचित्रे, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि माहिती व्यवस्थापनाच्या आधुनिक साधनांमुळे मदतकार्य अधिक जलद आणि परिणामकारक करता येते. मात्र डिजिटल माध्यमांमध्ये चुकीची माहिती, अफवा आणि बनावट मदत आवाहनेही वेगाने पसरू शकतात. त्यामुळे माहितीची सत्यता तपासणे, पारदर्शकता राखणे आणि वैयक्तिक माहितीचे संरक्षण करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाचा वापर मानवतेच्या सेवेसाठी झाला पाहिजे; मानवी असुरक्षिततेचा गैरफायदा घेण्यासाठी नव्हे.

मानवतावादाचा संबंध सामाजिक न्यायाशीही आहे. संकट निर्माण झाल्यानंतर मदत करणे महत्त्वाचे आहे; परंतु समाजातील विषमता, गरिबी, बेरोजगारी, अशिक्षण, आरोग्यसेवेतील तफावत आणि सामाजिक बहिष्कार यांसारख्या संकटांच्या मूळ कारणांकडेही लक्ष दिले पाहिजे. जे समुदाय आधीपासूनच आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या दुर्बल आहेत, ते आपत्तीच्या काळात अधिक असुरक्षित होतात. म्हणून मानवतावादी कार्याबरोबर सामाजिक सक्षमीकरणाची प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीला शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि सामाजिक संरक्षणाची समान संधी मिळाली तर संकटांचा सामना करण्याची तिची क्षमता वाढते.

जागतिक मानवतावादी दिन हा त्यामुळे केवळ मानवतावादी कार्यकर्त्यांना अभिवादन करण्याचा दिवस नाही; तो आपल्या सामाजिक संवेदनशीलतेची परीक्षा घेणारा दिवस आहे. आपल्या आसपास एखादा वृद्ध मदतीच्या प्रतीक्षेत आहे का, एखादे गरीब कुटुंब अडचणीत आहे का, एखाद्या विद्यार्थ्याला शिक्षणासाठी आधाराची गरज आहे का, एखाद्या दिव्यांग व्यक्तीला सामाजिक सहकार्याची आवश्यकता आहे का किंवा एखादा आपत्तीग्रस्त नागरिक मदतीची अपेक्षा करीत आहे का, याचा विचार करण्याची ही संधी आहे. मानवतावाद मोठ्या घोषणांमध्ये नसतो; तो छोट्या-छोट्या कृतींमध्ये जगतो. एखाद्याला पाणी देणे, रक्तदान करणे, जखमीला रुग्णालयात पोहोचविणे, संकटात असलेल्या व्यक्तीचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे किंवा अन्यायाविरुद्ध आवाज उठविणे, या कृतीही मानवतेच्या सेवाच आहेत.

आज जग विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात वेगाने पुढे जात आहे; परंतु या प्रगतीला मानवी संवेदनशीलतेची जोड मिळाली नाही तर ती अपूर्ण राहील. उंच इमारती, वेगवान वाहतूक, आधुनिक तंत्रज्ञान आणि आर्थिक विकास यांना खरे मूल्य तेव्हाच प्राप्त होते, जेव्हा समाजातील प्रत्येक व्यक्ती सुरक्षित, सन्मानाने आणि आशेने जगू शकते. म्हणूनच मानवतावादी मूल्ये ही आजच्या जगाची गरज आहेत. संघर्षाऐवजी शांतता, द्वेषाऐवजी प्रेम, भेदभावाऐवजी समता, उदासीनतेऐवजी सहानुभूती आणि स्वार्थाऐवजी सहकार्य स्वीकारण्याची आवश्यकता आहे.

१९ ऑगस्टचा जागतिक मानवतावादी दिन आपल्याला याच मूल्यांची आठवण करून देतो. संकटाच्या काळात मदतीचा हात पुढे करणारे मानवतावादी कार्यकर्ते हे जगाच्या सामूहिक सद्सद्विवेकबुद्धीचे प्रतीक आहेत. त्यांच्या कार्याचा सन्मान करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे स्वतःच्या जीवनात मानवतेची मूल्ये रुजविणे. मानवतावाद हा एका दिवसापुरता मर्यादित राहू नये; तो आपल्या कुटुंबात, शाळेत, महाविद्यालयात, कार्यस्थळी आणि समाजजीवनात सतत आचरणात आणला पाहिजे. कारण माणुसकी जिवंत ठेवण्यासाठी मोठ्या पदाची किंवा संपत्तीची आवश्यकता नसते; आवश्यक असते ती दुसऱ्याच्या वेदनेची जाणीव आणि मदतीसाठी पुढे येण्याची तयारी.

मानवतेचा खरा विजय तेव्हा होतो, जेव्हा संकटात सापडलेल्या व्यक्तीला आपण एकटे पडू देत नाही. तिच्या अश्रूंमध्ये आपले अश्रू मिसळण्याची, तिच्या वेदनेत सहभागी होण्याची आणि तिच्या अंधारात आशेचा दिवा पेटविण्याची तयारी ठेवतो. जागतिक मानवतावादी दिनाचा संदेश म्हणून आपण एवढेच लक्षात ठेवू या की, जग बदलण्याची सुरुवात मोठ्या घोषणांपासून नव्हे, तर एका माणसाने दुसऱ्या माणसासाठी पुढे केलेल्या मदतीच्या हातापासून होते. संकट कितीही मोठे असो, माणुसकीची शक्ती त्याहून मोठी असते. म्हणूनच मानवतेचा हात धरू या, करुणेची वाट चालू या आणि प्रत्येकाच्या सन्मानाने जगण्याच्या अधिकारासाठी संवेदनशील समाजाची निर्मिती करू या. हाच जागतिक मानवतावादी दिनाचा खरा संदेश आणि मानवजातीच्या उज्ज्वल भविष्याचा भक्कम पाया आहे.


**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**ईमेल : bagate.rajendra5 @gmail.com**


# अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणी 24 वर्षीय तरुण अटकेत

### आरोपीला न्यायालयात हजर करणार

**अंबाजोगाई :** अंबाजोगाई शहरातील मोची गल्ली परिसरात १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याप्रकरणी अंबाजोगाई शहर पोलिसांनी २४ वर्षीय तरुणास अटक केली आहे. रीतीक देवदत्त चौधरी (वय २४, रा. मोची गल्ली, अंबाजोगाई) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी एका हॉटेलमध्ये काम करणाऱ्या कामगाराची असून, दि. १८ ऑगस्ट रोजी रात्री आरोपीने तिला मोबाईलवरून संपर्क साधून बोलावून घेतले. त्यानंतर तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप आहे. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर पीडित मुलीच्या तक्रारीवरून अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ३३५/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमांसह पोक्सो कायद्यान्वये कलम ४ व ६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, प्रकरणाचा पुढील तपास करण्यासाठी हा गुन्हा पिंक पथकाकडे वर्ग करण्यात आला आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शेंडगे यांनी तपासाची सूत्रे हाती घेत आरोपी रीतीक चौधरी यास अटक केली. आरोपीस न्यायालयासमोर हजर करण्यात येणार असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, आरोपीविरुद्ध यापूर्वीही भांडणासह अन्य स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांकडून मिळत असून, परिसरात त्याच्याविषयी दहशतीचे वातावरण असल्याचे सांगितले जात आहे. मोची गल्ली परिसरात काही टवाळखोर तरुणांकडून नागरिकांना त्रास होत असल्याच्या तक्रारीही स्थानिकांकडून व्यक्त केल्या जात आहेत. त्यामुळे या परिसरात पोलिसांनी अधिक प्रभावी गस्त वाढवून अशा प्रवृत्तींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# आष्टीमध्ये दुधातील भेसळीचा मोठा पर्दाफाश; 72 पोती पावडर जप्त

**बीड, 20 ऑगस्ट :** सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करत कृत्रिम दूध तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या भेसळयुक्त पावडरची चोरटी वाहतूक आष्टी पोलिसांनी उघडकीस आणली आहे. अन्न व औषध प्रशासन आणि पोलीस प्रशासनाने संयुक्त कारवाई करत बोलेरो पिकअपसह एकूण ७२ गोण्या भेसळयुक्त पावडर जप्त करून तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. आष्टी-जामगाव रस्त्यावरील नक्षत्र लॉन्ससमोर संशयित महिंद्रा बोलेरो पिकअप अडवून तपासणी केली असता, त्यामध्ये दुधात भेसळ करण्यासाठी वापरली जाणारी व्हे पावडरच्या ४७ गोण्या आढळून आल्या.

वाहनातील चालकाकडे अधिक चौकशी केली असता, त्याने यापूर्वी २५ गोण्या आष्टी येथील हर्षद हॉटेलसमोरील एका पत्र्याच्या शेडमध्ये उतरवल्याची माहिती दिली. पोलिसांनी दोन्ही ठिकाणांहून विनापरवाना व मानवी आरोग्यास अपायकारक असलेली एकूण २ लाख ६९ हजार ७०० रुपये किमतीची पावडर आणि वाहन पंचांसमक्ष जप्त केले.

या प्रकरणी वाहनचालक सुशांत उर्फ बाबु लक्ष्मण गोपाळघरे (वय २० वर्ष, रा. नागोबाचीवाडी, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर), मालाचे मालक हारीदास एकनाथ गोपाळघरे (रा. नागोबाचीवाडी, ता. जामखेड) आणि माल स्वीकारणारा कैलास हंबर्डे (रा. आष्टी) यांच्याविरुद्ध आष्टी पोलीस ठाण्यात अन्न सुरक्षा व मानके कायद्यासह भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. अन्न सुरक्षा अधिकारी अजय भगवान गाढे (वय २७ वर्ष, रा. बीड) यांच्या फिर्यादीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला असून, सहायक पोलीस निरीक्षक वाघमोडे यांच्या पथकाने ही कारवाई केली. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक शरद भुतेकर करीत आहेत.

# छत्रपती संभाजीनगरमध्ये तलाठी पदाची बनावट नियुक्ती पत्रे देऊन 41.50 लाखांची फसवणूक

**हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** निवासी उपजिल्हाधिकारी कार्यालयाच्या नावाचा आणि अधिकृत पदाधिकाऱ्यांच्या नावाचा गैरवापर करून, तलाठी पदावर नोकरी लावण्याचे आमिष दाखवून तब्बल ४१ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा अत्यंत गंभीर प्रकार छत्रपती संभाजीनगरमध्ये उघडकीस आला आहे. या प्रकरणी मुख्य आरोपी बाळासाहेब हरबक आणि त्याच्या एका साथीदाराविरुद्ध सिटी चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, २४ फेब्रुवारी ते १३ ऑगस्ट दरम्यान तहसील कार्यालय परिसरात हा संपूर्ण बनाव रचण्यात आला होता.

अजिनाथ ज्ञानेश्वर वरकड यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांच्या पत्नी अश्विनी तुपे यांना तलाठी पदावर नियुक्त करण्यासाठी १३ लाख ५० हजार रुपये उकळण्यात आले. तर अक्षय साईनाथ गायकवाड यांच्या भावाला, स्वप्निल गायकवाड याला नोकरी मिळवून देण्यासाठी २८ लाख रुपये घेण्यात आले. ही संपूर्ण रक्कम आरटीजीएस, यूपीआय तसेच रोख स्वरूपात घेण्यात आली होती.

उमेदवारांचा संपूर्ण विश्वास बसावा यासाठी आरोपींनी अत्यंत चलाखीने नियोजन केले होते. २४ फेब्रुवारीपासून सुभेदारी विश्रामगृह, तहसील कार्यालय आणि पंचायत समितीत आठवड्यातून तीन दिवस नियमित प्रशिक्षणाचा बनाव रचण्यात आला. पुणे आणि कोल्हापूरवरून विशेष प्रशिक्षक येत असल्याचे सांगून उमेदवारांची दिशाभूल करण्यात आली. एवढेच नव्हे तर उमेदवारांना तलाठी पदाची बनावट ओळखपत्रे, टॅब आणि महसूल विभागाच्या संगणकीय कामासाठी तहसीलदारांच्या स्वाक्षरीची बनावट पत्रे देखील देण्यात आली होती.

१० ऑगस्ट रोजी एका ई-मेल आयडीवरून उमेदवारांना नियुक्तीचे आदेश पाठवण्यात आले. परंतु, १३ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात अधिकृत पडताळणी केल्यानंतर हा सर्व प्रकार बनावट असल्याचे उजेडात आले. नियुक्ती आदेशावर लावण्यात आलेला जिल्हाधिकारी कार्यालयाचा शिक्का, तसेच निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते आणि तहसीलदार शिवानंद बिडवे यांच्या स्वाक्षऱ्या पूर्णपणे खोट्या व बनावट असल्याचे निष्पन्न झाले.

या प्रकरणात आणखीही काही तरुणांची अशाच प्रकारे बोगस नियुक्ती देऊन फसवणूक झाली असल्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. सहायक महसूल अधिकारी अनिल भगत यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी तपास सुरू केला असून, सहायक निरीक्षक मनोज शिंदे या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. अशा प्रकारे बोगस नियुक्तीच्या नावाखाली फसवणूक झालेल्या इतर व्यक्तींनी देखील न घाबरता पुढे येऊन पोलिसांकडे तात्काळ तक्रार नोंदवावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांनी केले आहे.

# जि.प.च्या जागा वाचवा; कागदपत्रे गायब कशी होतात?; लाडसावंगीच्या जागेसाठी 7.41 कोटींच्या मागणीने प्रशासन हादरले; स्थायी समितीत सदस्यांचा संताप

**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा परिषदेच्या कोट्यवधी रुपये किमतीच्या मालमत्तांची कागदपत्रेच उपलब्ध नसल्याचा धक्कादायक प्रकार गुरुवारी स्थायी समितीच्या बैठकीत उघड झाला. जि.प.च्या मालकीच्या जागांवर अतिक्रमण होत असताना संबंधित मालमत्तांच्या मूळ नोंदी आणि कागदपत्रे सुरक्षित ठेवण्यात प्रशासनाला अपयश का येत आहे, असा संतप्त सवाल सदस्यांनी उपस्थित केला. लाडसावंगी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जागेसाठी तब्बल ७ कोटी ४१ लाख रुपयांची मागणी झाल्याने जि.प.च्या मालमत्ता सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

अध्यक्ष अविनाश गलांडे यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समितीची बैठक झाली. सदस्य रतन बत्तीसे आणि पंकज ठोंबरे यांनी जिल्हा परिषदेच्या जागांवरील अतिक्रमणाचा मुद्दा उपस्थित केला. जि.प.च्या मालमत्तांची माहिती आणि नोंदी व्यवस्थित उपलब्ध होत नसल्याबद्दल त्यांनी प्रशासनाला धारेवर धरले.

जि.प.च्या विविध विभागांच्या ताब्यात असलेल्या जागा आणि मालमत्तांची



कागदपत्रे केवळ बांधकाम विभागाने सांभाळण्याऐवजी संबंधित प्रत्येक विभागाने स्वतंत्रपणे नोंद ठेवावी, अशी सूचना बांधकाम सभापती सचिन गरड यांनी केली. उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल यांनी मालमत्तांभोवती संरक्षक भिंती उभारून जि.प.च्या जागा प्रत्यक्ष ताब्यात घेण्याची मागणी केली. सर्व विभागांनी आपल्या मालमत्तांची अद्ययावत नोंदणी करून कागदपत्रे सुरक्षित ठेवावीत, असे अध्यक्ष गलांडे यांनी स्पष्ट केले.

### ८७ लाख भरले; आता ७.४१ कोटींची मागणी

लाडसावंगी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जागेच्या मालकीवरून मूळमालकाने न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या प्रकरणात न्यायालयाने जिल्हा परिषदेला नोटीस बजावली असून ७ कोटी ४१ लाख रुपये भरण्याची मागणी करण्यात आली आहे. विशेष म्हणजे २०२५ मध्ये याच प्रकरणात जि.प.ने ८७ लाख रुपये भरले होते. आता पुन्हा एवढ्या मोठ्या रकमेची मागणी झाल्याने मालमत्तांच्या कागदपत्रांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

### निष्काळजीपणा करणाऱ्यांवर कारवाई

लाडसावंगी प्रकरणातील न्यायालयीन प्रक्रियेत हयगय करणाऱ्या संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी करून कारवाई करण्यात येईल, असे मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांनी बैठकीत स्पष्ट केले. जि.प.च्या सर्व न्यायालयीन प्रकरणांच्या संचिका व्यवस्थित ठेवाव्यात. शपथपत्रांवर पूर्ण माहिती वाचूनच स्वाक्षरी करावी. न्यायालयीन कागदपत्रांसोबत मूळ संचिका उपलब्ध नसल्यास आपण स्वाक्षरी करणार नाही, असेही त्यांनी अधिकाऱ्यांना सुनावले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील लाभार्थ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे : जिल्हाधिकारी

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेची अंमलबजावणी ऑनलाइन संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येत असून, यासाठी शासनाने महाआयटीच्या माध्यमातून सहाय्यकांची नियुक्ती केली आहे. त्यामुळे शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील लाभार्थ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले आहे.

महाआयटीमार्फत संगणकीय प्रक्रिया करून एकूण 16.96 लाख इतक्या पात्र लाभार्थी शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यापैकी 13.48 लाख इतक्या शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण झाले असून, उर्वरित शेतकरी लाभार्थ्यांच्या आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया सुरू आहे. आधार प्रमाणीकरण प्रक्रियेमध्ये बँकर्स/बँकिंग यंत्रणांना नोंद न झालेल्या शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत आहे. संबंधित शेतकऱ्यांनी आपले आधार प्रमाणीकरण करून घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

शेतकऱ्यांनी जवळच्या आपले सरकार सेवा केंद्र येथे यादीतील विशिष्ट क्रमांकासह भेट द्यावी. सोबत आधार कार्ड व पासबुक घेऊन जावे. यादीतील विशिष्ट क्रमांक अथवा आधार क्रमांकाद्वारे पोर्टलवर आपल्या कर्जाबाबतची विस्तृत माहिती दिसेल. या माहितीनुसार मान्य/अमान्य पर्यायाची नोंद ऑनलाइन बोटाच्या ठशांची नोंद घेऊन करण्यात येईल. आधार प्रमाणीकरण करताना एका बोटाच्या ठशाची नोंद होत नसल्यास वेगवेगळ्या बोटांनी किमान तीन वेळा प्रमाणीकरण करण्याचा प्रयत्न करावा.

किमान तीन वेळा प्रयत्न करूनही आधार प्रमाणीकरण होत नसल्यास ‘प्रमाणीकरण शक्य नाही’ हा पर्याय निवडून आपले सरकार केंद्र चालकास कळवावे. या पर्यायाचा वापर केल्यानंतर आपले सरकार केंद्र चालकाने स्वतःच्या बायोमेट्रिकद्वारे आधार प्रमाणीकरण करावे. आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तक्रार तालुकास्तरीय समितीच्या पोर्टलवर पाठविण्यात येईल. संबंधित शेतकऱ्यांनी आपल्या तहसील कार्यालयात स्वतःची ओळख निश्चित करण्यासाठी आधार कार्ड, बँक पासबुक, ७/१२ उतारा आदी कागदपत्रे सोबत ठेवावीत. तालुकास्तरीय समिती कागदपत्रांची पडताळणी करून पात्रता निश्चित करेल. पात्र शेतकऱ्यांची तक्रार मान्य केल्यानंतर आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण होईल.

आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर लाभार्थी शेतकरी/बँकर्स यांची नोंद होऊन न झालेल्या शेतकऱ्यांचे कर्ज खात्यामध्ये कर्जमाफीच्या लाभाची ऑनलाइन पद्धतीने निकषानुसार रक्कम जमा करण्यात येईल. त्यामुळे जिल्ह्यातील पात्र लाभार्थी शेतकरी/बँकर्स यांची नोंद होऊन न शकणाऱ्या शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरणाबाबत वर नमूद प्रक्रियेनुसार तातडीने कार्यवाही करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## महा-वॉकेथॉनमध्ये नागरिकांनी सहभागी व्हावे : संजयसिंह चव्हाण

### ‘वॉक फॉर वॉटर’साठी धावणार परभणीकर; पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते उद्घाटन

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:** माजी मुख्यमंत्री स्व. सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त तसेच जलसंधारण दिनाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये जलसंधारणाबाबत जनजागृती करण्यासाठी उद्या शुक्रवार, दि. 21 ऑगस्ट रोजी सकाळी 7.30 वाजता ‘पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा’ या संदेशासह परभणी येथे ‘महा-वॉकेथॉन – वॉक फॉर वॉटर’साठी नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय येथून सुरुवात होणार असून, क्रीडा संकुल (कृषी विद्यापीठ), परभणी दरम्यान महा-वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. या महा-वॉकेथॉनचे उद्घाटन सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री तथा पालकमंत्री श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी महापौर सय्यद इकबाल, जिल्हा परिषद अध्यक्षा लता वाकळे, कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

कार्यक्रमास खासदार संजय जाधव, विधान परिषद सदस्य सईद खान, आमदार डॉ. राहुल पाटील, रत्नाकर गुट्टे व राजेश विटेकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर, पोलीस अधीक्षक पंकज कुमावत आणि महानगरपालिका आयुक्त नितीन नार्वेकर यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

राज्यात उद्या शुक्रवार, दि. 21 ऑगस्ट रोजी जलसंधारण दिन, 15 ते 21 ऑगस्टदरम्यान जलसंधारण सप्ताह तसेच 15 ऑगस्ट 2026 ते 26 जानेवारी 2027 या कालावधीत जलसंधारण अभियान राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत नागरिक, विशेषतः युवकांमध्ये मृद व जलसंधारणाबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी या वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे.

माती आणि पाणी ही नैसर्गिक संसाधने असून त्यांच्या संवर्धनासाठी व्यापक लोकसहभाग आवश्यक आहे. जलसंधारणाच्या माध्यमातून पाण्याची उपलब्धता वाढविणे, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करणे आणि भविष्यातील पाणीटंचाईवर प्रभावी उपाययोजना करणे शक्य आहे. त्यामुळे या जनजागृती उपक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन ‘आपला सहभाग, आपली बांधिलकी – जलसंवर्धनाची हीच खरी शक्ती’ हा संदेश प्रत्यक्षात आणावा, असे आवाहन मृद व जलसंधारण विभाग, परभणी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना 2026

## मयत कर्जदार शेतकऱ्यांच्या वारसांना लाभ मिळण्यासाठी मानक कार्यप्रणाली जाहीर

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी:-** राज्य शासनाने सुरू केलेल्या ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना 2026’ अंतर्गत पात्र ठरलेल्या परंतु आधार प्रमाणीकरणापूर्वी मयत झालेल्या शेतकऱ्यांच्या वारसांना कर्जमुक्तीचा लाभ देण्यासाठी सहकार आयुक्तालय व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य यांनी मानक कार्यप्रणाली जाहीर केली आहे.

योजनेच्या पहिल्या यादीतील 16.96लाख पात्र लाभार्थ्यांपैकी 13.48 लाख शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले असून उर्वरित प्रक्रिया सुरू आहे. या यादीतील मयत शेतकऱ्यांच्या खात्यांना वारस नोंद करून लाभ देण्यासाठी सहकार आयुक्त दिपक तावरे यांनी सर्व जिल्हाधिकारी, जिल्हा उपनिबंधक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापकांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

**मयत कर्जदारांच्या वारसांसाठीची कार्यप्रणाली जाहीर केली असून, यामध्ये वारस नोंद व पोर्टलवर माहिती:** मयत शेतकऱ्यांच्या कर्जखात्यावर बँकेच्या प्रचलित धोरणानुसार वारसांची नोंद केली जाईल. त्यानंतर योजनेच्या पोर्टलवरील अपलोड डिसीज्ड अकाऊंटस या सुविधेमार्फत वारसांची संपूर्ण माहिती अपलोड केली जाईल.

**तसेच आवश्यक तपशील व वाटणी:** बँकांनी मयत शेतकऱ्यांच्या वारसांचे कर्जखात्यातील हिस्से नमूद करणे बंधनकारक आहे. यामध्ये वारसाचे नाव, आधार क्रमांक, जन्मतारीख, मोबाईल क्रमांक, अग्रीस्टॅक नोंदणी, बचत खाते व कर्ज खाते क्रमांक यांसह संपूर्ण वैयक्तिक माहिती एकाच फाईलमध्ये अपलोड करावी लागेल. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बाबतीत माहिती अपलोड करण्यापूर्वी संबंधित शासकीय लेखापरीक्षकामार्फत कर्जखात्यांची तपासणी पूर्ण केली जाईल.

बँकांनी अपलोड केलेल्या माहितीचे महाआयटीमार्फत संस्करण करून पात्र कर्जखात्यांची नवी यादी विशिष्ट क्रमांकासह आधार प्रमाणीकरणासाठी प्रसिद्ध केली जाईल. कर्जमुक्तीच्या लाभासाठी प्रत्येक वारसाने आधार प्रमाणीकरण करणे आवश्यक असून, या प्रक्रियेवेळी वारसाकडे अग्रीस्टॅक नोंदणी / फॉर्मर आयडी असणे अनिवार्य केले आहे. एकापेक्षा अधिक वारस असल्यास कर्जमुक्तीच्या निकषांनुसार मयत शेतकऱ्यांच्या कर्ज रकमेतील वारसांच्या वाटणीप्रमाणे रक्कम कर्जखात्यात थेट वर्ग करण्यात येणार आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयात उत्साहात सद्भावना दिन साजरा

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर:** माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात सद्भावना दिन अत्यंत उत्साहात वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सद्भावना प्रतिज्ञा देण्यात आली. अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे यांनी उपस्थितांना प्रतिज्ञा दिली. यावेळी उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जात, वंश, धर्म, प्रदेश किंवा भाषा यांचा कोणताही भेद न बाळगता सर्व भारतीयांमध्ये भावनिक ऐक्य आणि सामंजस्य टिकवून ठेवण्यासाठी सातत्याने कार्य करण्याची शपथ घेतली. तसेच, परस्पर संवाद आणि संविधानिक मार्गांचा अवलंब करून सर्व प्रकारचे मतभेद व वाद शांततापूर्ण मार्गाने सोडवण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. या महत्त्वपूर्ण कार्यक्रमास जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध विभागांचे विभागप्रमुख, अधिकारी आणि मोठ्या संख्येने कर्मचारी उपस्थित होते.

## एशियन हॉस्पिटलमध्ये नातवासाठी आजीने किडनी दिल्याने नवजीवन

### प्रत्यारोपणाची गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी




**छत्रपती संभाजीनगर :** नातवाच्या दोन्ही किडन्या निकामी झाल्याने गंभीर संकटात सापडलेल्या कुटुंबाला आजीने आपल्या त्यागातून नव्या आयुष्याची आशा दिली. नातवाला जीवनदान मिळावे यासाठी आईच्या आईने स्वतःची किडनी दान करण्याचा धाडसी निर्णय घेतला. त्यानंतर एशियन हॉस्पिटल इन्स्टिट्यूट अँड रिसर्च सेंटर येथे किडनी प्रत्यारोपणाची गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. उपचारानंतर आजी आणि नातू दोघांचीही प्रकृती स्थिर असून, त्यांना रुग्णालयातून आनंदाने डिस्चार्ज देण्यात आला.

नातवाच्या दोन्ही किडन्या निकामी झाल्याचे समजल्यानंतर कुटुंबावर मोठे संकट कोसळले होते. नातवाची होणारी अवस्था पाहून आजीचे मन हेलावले. नातवाला नवजीवन मिळावे यासाठी त्यांनी स्वतःची किडनी दान करण्याचा निर्णय घेतला. आजीच्या या त्यागामुळे नातवाच्या उपचारांना मोठी मदत झाली.

ही गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी करण्यासाठी एशियन हॉस्पिटलच्या किडनी प्रत्यारोपण पथकाने विशेष परिश्रम घेतले. ज्येष्ठ मूत्ररोगतज्ज्ञ व किडनी प्रत्यारोपण शल्यचिकित्सक डॉ. शरद सोमाणी, मूत्ररोगतज्ज्ञ डॉ. जोशी, किडनी प्रत्यारोपण तज्ज्ञ डॉ. अनिकेत मालवे तसेच वैद्यकीय पथकाने नियोजनबद्ध पद्धतीने उपचार करून शस्त्रक्रिया यशस्वी केली.

या यशाबद्दल एशियन हॉस्पिटलचे चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक डॉ. शोएब हाश्मी यांनी आजीच्या त्यागाचे कौतुक केले. ते म्हणाले, आजीने स्वतःचा विचार न करता नातवाला दिलेले नवजीवन हे नात्यांमधील प्रेम आणि त्यागाचे प्रेरणादायी उदाहरण आहे. रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबाला कठीण प्रसंगातून बाहेर काढून पुन्हा आनंदी पाहणे हे रुग्णालयाच्या संपूर्ण टीमचे ध्येय आहे.

पूर्वी किडनी प्रत्यारोपणासारख्या गुंतागुंतीच्या उपचारांसाठी रुग्णांना मुंबई, पुणे यांसारख्या मोठ्या शहरांमध्ये जावे लागत असे. मात्र, आता छत्रपती संभाजीनगरमध्येही अशा प्रकारच्या जटिल शस्त्रक्रिया उपलब्ध होत असल्याचे डॉ. हाश्मी यांनी सांगितले.

## महिन्याभरात वृक्षलागवडीचे उद्दिष्ट पूर्ण करा : अपर जिल्हाधिकारी शोभा जाधव

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी,:** राज्य शासनाच्या ‘300 कोटी वृक्षलागवड अभियान (2026-2047)’ तसेच हरित पायाभूत सुविधा उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्ह्यात विविध विभागांना सन 2026 साठी दिलेल्या विभागनिहाय व यंत्रणानिहाय वृक्षलागवडीचे उद्दिष्ट पूर्ततेसाठी सर्व विभागांनी येत्या महिनाभरात पूर्ण करावे, असे निर्देश अपर जिल्हाधिकारी शोभा जाधव यांनी दिले.

सन 2026 च्या पावसाळ्यात करण्यात आलेल्या वृक्षलागवडीचा आढावा घेण्यासाठी अपर जिल्हाधिकारी शोभा जाधव यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय बैठक घेण्यात आली. यावेळी बैठकीस विभागीय वन अधिकारी श्रीमती एस. एस. पठाण, कृषि उपसंचालक एस. एस. जाधवर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजीवन लखमावार, वरिष्ठ तुरुंग अधिकारी राजेंद्र मरळे, कार्यकारी अभियंता कविराज कुचे, नायब तहसीलदार व्ही. एच. पक्वाने यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



सामाजिक वनीकरण विभागाने वर्षभर वृक्षलागवडीसाठी आवश्यक रोपे तयार ठेवावीत. विविध विभागांकडून रोपांची मागणी नोंदवून घेऊन त्यानुसार वेळेत रोपांचे वितरण करण्याची जबाबदारी प्रभावीपणे पार पाडावी, असे निर्देश अपर जिल्हाधिकारी शोभा जाधव यांनी दिले. राज्य शासनाच्या 300 कोटी वृक्षलागवड अभियानाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी आपापली भूमिका चोखपणे बजावून या अभियानात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

बैठकीत पोलीस अधीक्षक कार्यालय, कृषी विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरण, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एमआयडीसी, सामाजिक न्याय विभाग, समाजकल्याण, पशुसंवर्धन, प्रदूषण नियंत्रण, वक्फ, आकाशवाणी, जायकवाडी प्रकल्प, लघु पाटबंधारे, महसूल विभाग, राज्य उत्पादन शुल्क, आरोग्य विभाग, जिल्हा कारागृह, शिक्षण संस्था, पाणीपुरवठा विभाग, दुग्धविकास विभाग, राष्ट्रीय महामार्ग, जिल्हा क्रीडा कार्यालय, नगरपालिका प्रशासन, जिल्हा रेशीम विकास विभाग, समाजकल्याण विभाग, पशुसंवर्धन विभाग, जिल्हा आरोग्य विभाग, आदी विभागांच्या वृक्षलागवडीच्या उद्दिष्टांचा व प्रगतीचा आढावा घेण्यात आला.

सप्टेंबरअखेरपर्यंत प्रत्येक विभागाने आपले वृक्षलागवडीचे उद्दिष्ट पूर्ण करावे. त्यासाठी ‘अमृत वृक्ष’ ॲप डाउनलोड करून वृक्षलागवडीची माहिती वेळोवेळी ॲपवर अपलोड करावी. विभागनिहाय वृक्षलागवडीची प्रगती, उपलब्ध रोपे, उद्दिष्टपूर्ती तसेच ‘अमृत वृक्ष’ ॲपवर करण्यात येणारी नोंदणी याबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. मुख्यमंत्री स्तरावर या अभियानाचा नियमित आढावा घेतला जात असल्याने वृक्षलागवडीबरोबरच त्याची डिजिटल नोंद करणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे विभागीय वन अधिकारी श्रीमती पठाण यांनी सांगितले.

जिल्ह्यातील विविध रोपवाटिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोपे उपलब्ध आहेत. संबंधित विभागांनी आपल्या आवश्यकतेनुसार रोपांची मागणी नोंदवून रोपे प्राप्त करून घ्यावीत आणि उपलब्ध जागांवर नियोजनबद्ध पद्धतीने वृक्षलागवड करावी. वृक्षलागवड पूर्ण झाल्यानंतर त्याची छायाचित्रांसह माहिती ‘अमृत वृक्ष’ ॲपवर अपलोड करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

वृक्षलागवड अभियानाला लोकसहभागाची जोड देण्यासाठी ‘एक वृक्ष मॉं के नाम’ तसेच ‘एक विद्यार्थी–एक वृक्ष’ या उपक्रमांतर्गत नागरिक, विद्यार्थी, शैक्षणिक संस्था आणि विविध सामाजिक संस्थांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवावा. लागवड केलेल्या वृक्षांचे संगोपन व संवर्धन करण्यावरही विशेष भर द्यावा, असे आवाहन करण्यात आले.

## माजी प्रधानमंत्री राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त दिली सद्भावना शपथ

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :** भारताचे माजी प्रधानमंत्री भारतरत्न राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त २० ऑगस्ट हा दिवस देशभरात ‘सद्भावना दिवस’ म्हणून साजरा करण्यात येतो. या निमित्ताने जिल्हाधिकारी कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती अनुराधा ढालकरी यांनी राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करत उपस्थितांना सद्भावना शपथ दिली.



यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी अरुणा संगेवार तसेच उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी देशाची एकता, अखंडता आणि सामाजिक सलोखा वृद्धिंगत करण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहण्याचा संकल्प केला. विविध धर्म, भाषा, प्रांत व समुदायातील नागरिकांमध्ये परस्पर बंधुभाव, सहिष्णुता आणि सौहार्दाची भावना वाढीस लागावी, हा सद्भावना दिवस साजरा करण्यामागील प्रमुख उद्देश आहे

राजीव गांधी यांनी देशाच्या विकासात आधुनिक तंत्रज्ञान, संगणकीकरण आणि दूरसंचार क्षेत्राला चालना देण्यासोबतच युवकांना राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत सहभागी करून घेण्यावर भर दिला. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांचे स्मरण करून राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक ऐक्य मजबूत करण्याचा संकल्प करण्यात आला. सद्भावना दिवसाच्या निमित्ताने जिल्ह्यातील नागरिकांनी जात, धर्म, भाषा व प्रादेशिकतेच्या पलीकडे जाऊन परस्परांमध्ये प्रेम, बंधुभाव आणि शांततेची भावना वृद्धिंगत करण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात आले.

## संगणकशास्त्र विभागप्रमुखपदी डॉ.प्रवीण यन्नावार

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुखपदी डॉ.प्रवीण लक्ष्मीकांत यन्नावार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांनी आगामी तीन वर्षांसाठी सदर नियुक्ती केली आहे. डॉ.रमेश मंझा यांच्याकडून डॉ.यन्नावर यांनी बुधवारी (दि.१९) पदभार स्विकारला. डॉ.यन्नावार हे गेल्या १८ वर्षांपासून विभागात कार्यरत असून ’युनिक’चे संचालक , परीक्षा व मूल्यमापन मंडळ सदस्य व आविष्कारचे समन्वयक म्हणूनही ते कार्यरत आहेत.

## विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेत पारदर्शकतेला प्राधान्य; नो-मॅपिंग व अनामली प्रकरणांवर सुनावणी

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी:** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार परभणी जिल्ह्यात मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षणाची प्रक्रिया सुरू असून, या प्रक्रियेत मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक व अद्ययावत करण्यावर भर देण्यात येत आहे. जिल्ह्यातील चार विधानसभा मतदारसंघांमध्ये एकूण १५ लक्ष ४१ हजार ७ मतदार आहेत. त्यापैकी एकूण १ लक्ष ८० हजार २४७ मतदारांचे नोंदी सापडत नाहीत. तसेच ६,३९० मतदारांच्या नोंदींमध्ये विसंगती आढळून आल्या आहेत. अशा मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

नोंदी नसलेल्या १,८०,२४७ मतदारांच्या याद्या जिल्हा प्रशासनाकडून पारदर्शकतेच्या दृष्टीने सार्वजनिक करण्यात आल्या आहेत. सदर याद्या परभणी जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळावर, महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर तसेच संबंधित सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. याशिवाय संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत त्यांच्या मतदार यादी भागातील राजकीय पक्षांनी नियुक्त केलेल्या केंद्रस्तरीय प्रतिनिधी यांना सदर याद्यांची प्रत देण्यात आली आहे. तसेच जिल्ह्यातील सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या जिल्हाध्यक्षांना प्रत्येकी एक प्रत उपलब्ध करून देण्यात आली होती. जिल्ह्यातील सर्व माननीय आमदार व माननीय खासदार यांनाही सदर याद्या ई-मेलद्वारे उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

सदर अनकलेक्टेबल मतदारांच्या यादीबाबत काही आक्षेप अथवा हरकत असल्यास ती दि. १७ ऑगस्ट २०२६ पर्यंत सादर करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. निर्धारित प्रक्रिया पूर्ण करून पात्रता सिद्ध न झालेल्या व नियमानुसार अपात्र ठरणाऱ्या अनकलेक्टेबल मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच माहितीच्या नोंदी सापडत नसलेल्या व मॅपींग न झालेल्या मतदारांची सुनावणी नियमानुसार घेण्यात येणार आहे. सुनावणीच्या वेळी संबंधित मतदारांना आपले म्हणणे मांडण्याची तसेच आवश्यक कागदपत्रे व पुरावे सादर करण्याची संधी देण्यात येईल. उपलब्ध अभिलेख, कागदपत्रे व संबंधितांचे म्हणणे विचारात घेऊन नियमानुसार निर्णय घेण्यात येणार आहे. या प्रक्रियेमुळे पात्र मतदारांचे हक्क अबाधित ठेवत मतदार यादीतील त्रुटी, विसंगती व अनियमित नोंदींचे नियमानुसार निराकरण करण्यास मदत होणार आहे. मतदार यादीशी संबंधित कोणत्याही कामासाठी कोणत्याही व्यक्तीस लाच अथवा अनधिकृत रक्कम देऊ नये, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, परभणी यांनी जिल्ह्यातील सर्व मतदारांना केले आहे. मतदार यादीतील नाव समाविष्ट करणे, दुरुस्ती करणे, मॅपिंग करणे, या प्रक्रियेतील कार्यवाही करणे अथवा इतर कोणत्याही निवडणूकविषयक कामासाठी शासनाकडून कोणतेही शुल्क आकारले जात नसून निश्चित केलेल्या प्रक्रियेचा अवलंब करून सदरील सेवा निशुल्क पुरविण्यात येतात. त्यामुळे कोणत्याही अधिकारी, कर्मचारी अथवा अन्य व्यक्तीकडून लाचेची किंवा अनधिकृत रकमेची मागणी झाल्यास नागरिकांनी अशा मागणीस बळी पडू नये व संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे तत्काळ तक्रार करावी. एसआयआर प्रक्रिया ही पारदर्शक व नियमानुसार राबविण्यात येत असून, पात्र मतदाराचे नाव मतदार यादीत कायम राहावे आणि अपात्र, विसंगत अथवा नियमबाह्य नोंदींचे नियमानुसार निराकरण व्हावे, यासाठी प्रशासनाकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे. सर्व मतदारांनी सुनावणीच्या वेळी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी संजय सिंह चव्हाण यांनी केले आहे.

## शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्यासाठी सुवर्णसंधी; छत्रपती संभाजीनगरमध्ये ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरु

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील (विजाभज, इमाव, विमाप्र) उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाची बातमी आहे. इयत्ता बारावीनंतर उच्च शिक्षणातील व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या पात्र विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेश अर्ज भरण्याची प्रक्रिया सध्या सुरू करण्यात आली आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना शासनाच्या अधिकृत ऑनलाइन पोर्टलवर अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या प्रवेश प्रक्रियेसाठी विभागाने सविस्तर वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना ३१ ऑगस्टपर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करण्याची मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी १ ते ७ सप्टेंबर दरम्यान केली जाईल. छाननी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर गुणवत्तेच्या आधारावर पहिली अंतिम निवड यादी ८ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध केली जाईल. या पहिल्या यादीत नाव आलेल्या विद्यार्थ्यांना १८ सप्टेंबरपर्यंत वसतिगृहात प्रत्यक्ष प्रवेश घेता येणार आहे.

पहिली निवड यादी जाहीर झाल्यानंतरही काही जागा रिक्त राहिल्यास, प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांमधून गुणवत्तेनुसार दुसरी निवड यादी २१ सप्टेंबर रोजी जाहीर केली जाईल. या दुसऱ्या निवड यादीतील विद्यार्थ्यांना ३० सप्टेंबरपर्यंत आपला प्रवेश निश्चित करता येईल.


**इच्छुक आणि पात्र विद्यार्थ्यांनी शासनाच्या** http://hmasnew.mahit.org/ या ऑनलाइन वसतिगृह प्रवेश पोर्टलवर जाऊन आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक दयानंद कोकरे यांनी केले आहे. विद्यार्थ्यांनी वेळेत अर्ज करून या शासकीय योजनेचा लाभ घ्यावा असे आहवन करण्यात आले आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No : MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आरोग्यसेवेला नवी बळकटी

### पैठणला 100, पाचोडला 50 खाटांचे रुग्णालय



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी पैठण येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय, तर पाचोड येथे ५० खाटांचे ग्रामीण रुग्णालय उभारण्याच्या हालचालींना वेग आला आहे. दोन्ही रुग्णालयांसाठी विशेष बाब म्हणून प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

मंत्रालयात आमदार विलास (बापू) संदिपान भुमरे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत पैठण व पाचोड येथील आरोग्य संस्थांबाबत सविस्तर चर्चा झाली. पैठण हे 'दक्षिण काशी' म्हणून ओळखले जाणारे महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असून, आगामी कुंभमेळ्यामुळे येथे भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाढत्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर पैठण येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय उभारण्याचा प्रस्ताव पुढे नेण्यात येणार आहे. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

दरम्यान, राष्ट्रीय महामार्गावर तसेच तीन जिल्ह्यांच्या सीमेलगत असलेल्या पाचोड येथेही आरोग्य सुविधांची गरज वाढली आहे. वाढती लोकसंख्या, वाहतुकीची वर्दळ आणि आपत्कालीन परिस्थितीचा विचार करून येथे ५० खाटांचे ग्रामीण रुग्णालय उभारण्यासाठी विशेष बाब म्हणून प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

छत्रपती संभाजीनगर शहरातील ४०० खाटांच्या महिला रुग्णालयाच्या लोकार्पणाची तयारीही वेगाने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. रुग्णालयासाठी आवश्यक मनुष्यबळ, वैद्यकीय उपकरणे आणि पायाभूत सुविधा सज्ज करण्यावर भर देण्यात आला आहे. पैठण व पाचोड येथील प्रस्तावित रुग्णालये तसेच शहरातील महिला रुग्णालयामुळे जिल्ह्याच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला मोठी बळकटी मिळणार आहे. कुंभमेळ्यासह वाढत्या धार्मिक पर्यटनाच्या पार्श्वभूमीवर नागरिक व भाविकांना दर्जेदार आणि तत्काळ आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यास शासनाचे प्राधान्य राहणार आहे.

बैठकीस सार्वजनिक आरोग्य विभागाचे आयुक्त संजय काटकर, सहसंचालिका डॉ. सुनीता गोल्हाईत यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## वसंत भवन लवकरात लवकर कार्यान्वित करा; महापौर समीर राजूरकर यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेत विकास प्रकल्पांची उच्चस्तरीय आढावा बैठक

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर



छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने शहरात राबविण्यात येत असलेल्या विविध महत्त्वाच्या विकासकामांची आणि प्रकल्पांची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी महापौर समीर राजूरकर यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात एक उच्चस्तरीय आढावा बैठक पार पडली. या महत्त्वपूर्ण बैठकीस स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, सभागृह नेते गोविंद केंद्रे, महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, अतिरिक्त आयुक्त रणजित पाटील, अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी संतोष वाहुळे, शहर अभियंता संजय कोंबळे यांच्यासह सर्व उपायुक्त व कार्यकारी अभियंते उपस्थित होते.

बैठकीची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तू संग्रहालयाच्या नूतनीकरणाच्या प्रस्तावावर चर्चा करून झाली. या प्रकल्पाच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाकडे पाठवणे अधिक योग्य ठरेल, अशी सूचना यावेळी महापौरांनी केली. तसेच प्रस्ताव तयार करण्यात आला असून जिल्हा नियोजन समितीकडे अकरा कोटी रुपयांच्या निधीची मागणी करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. हा प्रस्ताव वेदांतनगर आणि वसंत भवन येथील प्रकल्पांचा आढावा घेतला असता, वसंत भवनचे भोगवटा प्रमाणपत्र व आवश्यक कागदपत्रे आता उपलब्ध झाल्याची माहिती देण्यात आली. यावर आयुक्त अमोल येडगे यांनी पुढील आठवड्यात स्वतंत्र बैठक घेऊन वसंत भवन लवकरात लवकर नागरिकांच्या सेवेसाठी पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने सर्व आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

यासोबतच कांचनवाडी येथील श्वान दफनभूमीच्या कामासह कांचनवाडी व चिकलठाणा येथील 'वर्किंग वुमन हॉस्टेल'च्या प्रगतीचाही आढावा घेण्यात आला. कांचनवाडी येथील हॉस्टेलचे काम फेब्रुवारी २०२७ मध्ये, तर चिकलठाणा येथील हॉस्टेलचे काम जानेवारी २०२७ पर्यंत पूर्ण होईल, अशी माहिती यावेळी सादर करण्यात आली. या दोन्ही प्रकल्पांचे काम वेळेत पूर्ण करण्यासाठी दर आठवड्याला नियमित पाठपुरावा करण्याचे निर्देश महापौरांनी दिले.

## फर्दापूर ग्रामपंचायतीच्या भ्रष्ट कारभाराची होणार पोलखोल बोगस कामे आणि निधी अपहार प्रकरणी थेट जिल्हाधिकाऱ्यांचे चौकशीचे आदेश

### मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना (CEO) कठोर कारवाईचे निर्देश फर्दापूरमध्ये उडाली खळबळ

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

फर्दापूर ता. सोयगाव फर्दापूर ग्रामपंचायतीमध्ये मागील कालावधीत झालेल्या कथित बोगस विकासकामे आर्थिक घोटाळा आणि शासकीय निधीच्या मोठ्या अपहाराची आता सखोल चौकशी होणार आहे. या भ्रष्ट कारभाराविरुद्ध करण्यात आलेल्या तक्रारीची गंभीर दखल घेत थेट छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालयाने या प्रकरणाच्या सखोल चौकशीचे कडक निर्देश दिले आहेत या आदेशामुळे ग्रामपंचायतीचा कारभार हाकणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत

काय आहे नेमके प्रकरण

फर्दापूर येथील जागरूक नागरिक शेख वाजिद शेख निसार यांनी ४ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रशासनाला एक सविस्तर निवेदन दिले होते या निवेदनात त्यांनी ग्रामपंचायतीमध्ये कागदोपत्री बनावट Bogus विकास कामे दाखवून शासनाच्या लाखो रुपयांच्या निधीचा अपहार झाल्याचा अत्यंत गंभीर आरोप केला होता या प्रकरणाची पाळेमुळे खोदून सखोल चौकशी करावी आणि जनतेच्या पैशांवर डल्ला मारणाऱ्या दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी आग्रही मागणी त्यांनी केली होती

जिल्हाधिकाऱ्यांचा दणका

या तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेत छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालयाच्या गृह शाखा नायब तहसीलदारांनी २५ मे २०२६ रोजी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना CEO अधिकृत पत्र काढले आहे या पत्रात तक्रारदाराच्या निवेदनाची प्रत जोडण्यात आली असून या गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी करून शासनाच्या नियमानुसार तात्काळ आणि कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत तसेच या चौकशीनंतर केलेल्या कारवाईचे उत्तर अर्जदाराला देण्याचेही सूचित केले आहे

आता पुढे काय ग्रामस्थांचे लक्ष

जिल्हाधिकाऱ्यांच्या या थेट आदेशामुळे फर्दापूर ग्रामपंचायतीमधील भ्रष्टाचाराचे मोठे रॅकेट उघडकीस येण्याची शक्यता निर्माण झाली आहे जनतेच्या विकासासाठी आलेला निधी कुणाच्या खिशात गेला कोणती कामे फक्त कागदावरच झाली याची आता पोलखोल होणार आहे या चौकशीत नेमके काय सत्य बाहेर येते आणि या 'बोगस' कारभारातील दोषींवर प्रशासन नेमका कोणता बडगा उगारते याकडे आता संपूर्ण फर्दापूर ग्रामस्थांचे लक्ष लागून राहिले आहे

## घरफोडी, चोरीच्या चार गुन्ह्यांचा छडा; सराईतांसह तिघे जेरबंद



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : घरफोडी, चोरी व लुटमारीच्या गंभीर गुन्ह्यांमध्ये सक्रिय असलेल्या सराईत आरोपींसह तिघांना जवाहरनगर पोलिसांनी अटक केली. आरोपींच्या चौकशीत जवाहरनगर, सातारा आणि पुंडलिकनगर पोलिस ठाण्यांच्या हद्दीतील चार चोरी व घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. आरोपींकडून सुमारे १ लाख २५ हजार रुपये किमतीची मोटारसायकल आणि चोरीचा अन्य मुद्देमाल जप्त करण्यात आला.

७ ऑगस्टच्या रात्री योगेश्वरी अपार्टमेंट परिसरात घरफोडी करून टेपरेकॉर्डर चोरीला गेल्याची तक्रार पोलिसांना मिळाली होती. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास करत पोलिसांनी शेख आदिल शेख जावेद (रा. शंभुनगर) आणि अरफात शेख अतिक शेख (रा. देवानगरी) यांना ताब्यात घेतले. न्यायालयाने त्यांना दोन दिवसांची पोलिस कोठडी दिल्यानंतर चौकशीत चोरीच्या अन्य गुन्ह्यांची माहिती समोर आली.

आरोपींनी उल्कानगरी येथील कृषी विभागाच्या कार्यालयातून इन्व्हर्टर व बॅटरी चोरी केल्याची कबुली दिली. या गुन्ह्यात अर्जुन केसरसिंग राजपूत (रा. शंभुनगर) याचा सहभाग निष्पन्न झाला. तसेच सातारा हद्दीतील जैन शाळेजवळील लॉर्ड हॉल परिसरातून तांब्याची व पितळी भांडी चोरी केल्याचेही तपासात उघड झाले. या प्रकरणात फरार व तडीपार आरोपी आमिर आयुब शेख, तसेच शेख रिझवान शेख रहेमान आणि जाहेद बागवान यांचा सहभाग असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

दरम्यान, पुंडलिकनगर हद्दीतील राजेशनगर बायपास परिसरातील घरफोडीचा गुन्हाही आरोपींनी उघड केला. आरोपी शेख आदिल याच्याविरुद्ध चोरी, घरफोडी व लुटमारीचे पाचपेक्षा अधिक गंभीर गुन्हे, तर फरार आरोपी आमिर आयुब शेख याच्याविरुद्ध दहापेक्षा अधिक गंभीर गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले.

ही कारवाई पोलिस आयुक्त प्रविण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक सचिन कुंभार यांच्या नेतृत्वात करण्यात आली. पीएसआय रावसाहेब वाघ, अनिल भाले, देगलूर, उपाध्याय, मारोती गोरे आणि राजू शिंदे यांनी तपासात कामगिरी बजावली.

## छोट्या गावातून मोठ्या स्वप्नांकडे!'-वैष्णवी देसाई यांनी विद्यार्थ्यांना दिले करिअर मार्गदर्शन

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.२० ऑगस्ट

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे विद्यार्थ्यांसाठी विशेष करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी कुमारी वैष्णवी अनिल देसाई,बी.ई.कॉम्प्युटर,डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड इनोव्हेशन, पुणे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शिक्षण,करिअरच्या विविध संधी आणि छोट्या गावातूनही मोठी स्वप्ने साकार करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रयत्नांबाबत मार्गदर्शन केले.



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी परिस्थितीला मर्यादा न मानता जिद्द, मेहनत,सातत्य आणि योग्य नियोजनाच्या जोरावर उच्च शिक्षण घेऊन विविध क्षेत्रांत यश मिळवता येते, असा प्रेरणादायी संदेश वैष्णवी देसाई यांनी विद्यार्थ्यांना दिला. विशेष बाब म्हणजे वैष्णवी देसाई या याच शाळेतील कलानिदेशक अनिल देसाई यांच्या कन्या आहेत. त्यामुळे आपल्या शाळेतील शिक्षकांच्या मुलीने छोट्या गावातून शिक्षण घेत पुण्यात अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण करून करिअरची वाटचाल केल्याचे विद्यार्थ्यांसाठी विशेष आकर्षण आणि प्रेरणेचे ठरले.

या कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भगवान सोनवणे,मुख्याध्यापक हरिदास काटोले, किरणकुमार पाटील,सुरेखा चौधरी,रामचंद्र महाकाळ, मंगला बोरसे,सविता पाटील,कोळी मॅडम,गणेश बाविस्कर, अंकुश काळे,अनिल देसाई,विवेक महाजन,तानाजी चव्हाण, विकार सर, बागवान सर तसेच इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.वैष्णवी देसाई यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये उच्च शिक्षणाची आणि भविष्यात मोठे यश मिळवण्याची नवी उमेद निर्माण झाली.

## जिल्हा माहिती कार्यालयातील रद्दी विक्री; दरपत्रके मागविली

**छत्रपती संभाजीनगर,दि.२०(जिमाका)** : येथील जिल्हा माहिती कार्यालयातील जुनी वृत्तपत्रांची रद्दी विक्री करावयाची आहे.त्यासाठी इच्छुक खरेदीदारांकडून दरपत्रके मागविण्यात आले आहेत. त्यासाठी इच्छुक खरेदीदारांनी आपली दरपत्रके शुक्रवार,दि.२८ रोजी दुपारी दोन वाजेपर्यंत जिल्हा माहिती कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे सादर करावीत. वृत्तपत्र रद्दीची पाहणी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत करता येईल. जास्तीत जास्त दर देणाऱ्या खरेदीदारांना रद्दी विक्री करण्यात येईल. रद्दी विक्री प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर थांबवण्याचा अधिकार जिल्हा माहिती अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. रद्दी खरेदी करण्यास इच्छुक खरेदीदारांनी जिल्हा माहिती कार्यालय,दुसरा मजला,ग्रंथालय कक्ष,जिल्हाधिकारी कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे समक्ष भेट देऊन रद्दीची पाहणी करून दरपत्रक सादर करावे,असे जिल्हा माहिती अधिकारी यांनी कळविले आहे.

## गोलवाडी फाट्यावर नाशिक-पैठण एसटी बसचा ५ तास तांत्रिक बिघाड; रस्त्याच्या मधोमध दुरूस्तीमुळे वाढला अपघाताचा धोका!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर



नाशिकवरून पैठणच्या दिशेने प्रवाशांना घेऊन जाणारी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची (एसटी) बस गोलवाडी फाट्या जवळ अचानक तांत्रिक बिघाडामुळे बंद पडली. विशेष म्हणजे, ही बस तब्बल ५ तास रस्त्याच्या मधोमध आणि कडेला उभी करून त्याच ठिकाणी दुरुस्त करण्याचे मोठे काम सुरू होते. बसमध्ये ३० प्रवासी प्रवास करत होते, मात्र प्रशासनाने तात्काळ पावले उचलत प्रवाशांसाठी पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून दिली आणि त्यांना सुरक्षितपणे पुढील प्रवासासाठी रवाना केले, ज्यामुळे प्रवाशांची गैरसोय टळली.

**मिळालेली माहितीनुसार, ही लालपरी (MH20 BL3223) सकाळी नाशिकहून पैठणकडे निघाली होती. सकाळी** ८:०० च्या सुमारास गोलवाडी फाटा येथे पोहोचताच बसच्या इंजिनमध्ये अचानक तांत्रिक बिघाड झाला आणि ती जागीच बंद पडली. दुरुस्तीचे ५ तास वाढलेला अपघाताचा धोका आणि वाहतुकीचा खोळंबा काही वेळासाठी झाला होता. प्रवाशांना पर्यायी गाडीने पाठवण्यात आले असले, तरी बस रस्त्याच्या मधोमध ५ तास तशीच उभी राहिल्याने मोठा धोका निर्माण झाला होता. महामार्गावर रहदारी सुरू असताना त्याच धोकादायक स्थितीत बसच्या दुरुस्तीचे काम सलग ५ तास सुरू ठेवण्यात आले. मागून सुसाट वेगाने येणाऱ्या वाहनांमुळे या ठिकाणी अपघाताचा धोका अधिकच वाढला होता. तसेच, रस्त्याच्या मधोमध वाहन बंद पडल्यामुळे आणि दुरुस्तीचे काम चालल्यामुळे काही काळ वाहतुकीस तीव्र अडथळा निर्माण झाला असून वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागला.

## परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष कॅप्टन आशिष आनंद दामले 22 ऑगस्टला परभणी दौऱ्यावर

हिंदु प्रकाश वार्ता. प्रतिनिधी

**परभणी** : परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष तथा मंत्री दर्जा प्राप्त कॅप्टन आशिष आनंद दामले हे २१ व २२ ऑगस्ट रोजी परभणी, जालना, छत्रपती संभाजीनगर व बदलापूर दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या परभणी दौऱ्याचा कार्यक्रम निश्चित झाला असून विविध मान्यवरांच्या भेटींसह ब्राह्मण समाजाच्या कार्यक्रमास ते उपस्थित राहणार आहेत.

दामले हे २१ ऑगस्ट रोजी सायंकाळी ४ वाजता बदलापूर येथून छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करणार असून रात्री तेथे मुक्काम करतील. २२ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजता छत्रपती संभाजीनगर येथून परभणीकडे प्रयाण करून सकाळी १० वाजता परभणी येथील शासकीय विश्रामगृहात आगमन होणार आहे.

सकाळी १०.२० वाजता कॅप्टन दामले हे श्री. शंतनू सुभेदार यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देणार आहेत. त्यानंतर सकाळी १०.४० वाजता ब्राह्मण समाज आयोजन समितीचे सदस्य श्री. योगेश जोशी सोनपेठकर यांच्या प्रभाती नगर येथील निवासस्थानी सदिच्छा भेट देणार आहेत.

सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत ब्राह्मण समाज, परभणी यांच्या वतीने आयोजित 'ब्राह्मण समाज संवाद यात्रा' कार्यक्रमाच्या उद्घाटनासह 'संवाद बैठक' कार्यक्रमास कॅप्टन दामले उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम सरदेशपांडे हुरडा पार्टी ॲण्ड टुरिझम, पाथरी रोड, परभणी येथे होणार आहे. दुपारी २.३० वाजता महिला उद्योजिका सौ. निशा कुलकर्णी वझुरकर यांच्या 'पिझ्झा या आस्थापनेस' सदिच्छा भेट देणार असून त्यानंतर दुपारी ३ वाजता परभणीहून छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील. सायंकाळी ६ वाजता छत्रपती संभाजीनगर येथील हॉटेल हयात प्लेस येथे आगमन व मुक्काम असा त्यांचा दौरा कार्यक्रम आहे.

दरम्यान, त्यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर संबंधित प्रशासनाने आवश्यक त्या सुरक्षा व सोयी-सुविधांची व्यवस्था करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## विद्यार्थ्यांसाठी डिजिटल संगणक साक्षरता अभियान; ग्लोबल रिच फाउंडेशन व बोधी ट्री एज्युकेशनल फाउंडेशनचा संयुक्त पुढाकार

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी** : डिजिटल युगात संगणकाचे प्राथमिक ज्ञान ही काळाची गरज बनली आहे. ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना संगणक साक्षर करून भविष्यातील शिक्षण, रोजगार आणि तंत्रज्ञानाच्या संधींसाठी सक्षम करण्याच्या उद्देशाने ग्लोबल रिच एज्युकेशनल अँड सोशल वेल्फेअर फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य आणि बोधी ट्री एज्युकेशनल फाउंडेशन, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने 'डिजिटल संगणक साक्षरता अभियान' राबविण्यात येत आहे.

या अभियानांतर्गत BCIT (Basic Computer Information Technology) अभ्यासक्रमातून इयत्ता चौथीपासून पुढील विद्यार्थ्यांसह महिला व कर्मचाऱ्यांना संगणकाचे मूलभूत ज्ञान आणि डिजिटल कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रत्यक्ष संगणकावर प्रशिक्षित मार्गदर्शक, सुलभ अभ्यासक्रम आणि ऑनलाइन अभ्याससामग्री उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

'एक विद्यार्थी एक संगणक' या संकल्पनेतून प्रत्येक विद्यार्थ्याला प्रत्यक्ष संगणक हाताळण्याची संधी मिळावी, यावर विशेष भर देण्यात येणार आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रमाणपत्र तसेच कौशल्यविकास व रोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.

आज ऑनलाइन शिक्षण, डिजिटल बँकिंग, शासकीय सेवा, विविध स्पर्धा परीक्षा आणि रोजगाराच्या अनेक संधींसाठी डिजिटल ज्ञान आवश्यक झाले आहे. त्यामुळे पालकांनी मुलांना केवळ मोबाईल वापरायला न शिकवता त्याचा विधायक वापर आणि संगणक कौशल्य आत्मसात करण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. शाळा-महाविद्यालयांनीही विद्यार्थ्यांना या अभियानाची माहिती देऊन डिजिटल साक्षरतेच्या उपक्रमाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या अभियानासाठी ग्लोबल फाउंडेशनचे अध्यक्ष नंदकिशोर हत्तीअंबीरे सर (९५१८९३६९३८) तसेच बोधी ट्री एज्युकेशनल फाउंडेशनचे अध्यक्ष रामदास वाघमारे सर (८८८८१२५६१०) यांच्याशी संपर्क साधता येईल. "डिजिटल साक्षरता ही केवळ संगणक शिकण्याची प्रक्रिया नसून विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाला, कौशल्याला आणि भविष्यातील संधींना दिशा देणारी चळवळ आहे," असा संदेश देत या अभियानात विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि शैक्षणिक संस्थांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911